**विशेष पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**दिनांक २२/११/२०२२**

---

**शहरातील सार्वजीनक ठिकाणे, निर्जन स्थळे, बंद आस्थापणा, शाळा कॉलेज अशा ठिकाणी बेशीस्त वर्तन चिडीमारी व नशापाणी करणाऱ्यांना विरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदयान्वये कारवाई नोंद**

जिल्हयातील मोठी शहरे व गावखंडयांतर्गत असलेल्या शाळा, कॉलेज, गर्दीची मुख्य ठिकाणे, सार्वजनिक ठिकाणे, मैदान, निर्जन स्थळे, बंद आस्थापणा अशा ठिकाणी तसेच शहरातुन जाणारे महामार्ग ईत्यादी ठिकाणी नशापाणी करणे, बेशीस्त वर्तन करणे, चिडीमारी करणे असे प्रकार वारंवार व दैनंदिन होत असल्याच्या तक्रारी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशनला प्राप्त झाल्या होत्या तसेच जिल्हयात विशेषत: तरुण वर्गामध्ये अंमली पदार्थ व दारु सेवन करण्याचे प्रमाणात वाढ होत असल्याचे तसेच अशा स्वरुपाचे नशेच्या आहारी जावुन शरीराविरुध्द व संपत्तीविरुध्दचे व महिलाविरुध्दचे गुन्हयात वाढ होत असल्याचे दाखल होत असल्याचे आतापावेतो दाखल होत असलेल्या गुन्हयांवरुन निदर्शनात आल्याने मा. पोलीस अधीक्षक यवतमाळ डॉ. श्री. पवन बन्सोड यांनी अशा स्वरुपाचे गुन्हयांना आळा घालण्यासाठी तसेच मोठी शहरे व गावखंडयांतर्गत असलेल्या शाळा , कॉलेज, गर्दीची मुख्य ठिकाणे, सार्वजनिक ठिकाणे, मैदान, निर्जन स्थळे, बंद आस्थापणा अशा ठिकाणी तसेच शहरातुन जाणारे महामार्ग इत्यादी ठिकाणी नशापाणी करणे, बेशीस्त वर्तन करणे, चिडीमारी करणे, रश ड्रायव्हींग करणे इत्यादी प्रकारांना आळा घालण्यासाठी व त्यातुनच निर्माण होणारी गुन्हेगारी प्रवृत्ती रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवुन अशा प्रकारांवर कायमस्वरुपी निर्बंध घालण्याचे दृष्टीने परिणामकारक कारवाई करण्याचे आदेश जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनला दिले होते.

मा. पोलीस अधीक्षक डॉ. श्री. पवन बन्सोड यांनी दिलेल्या निर्देशांप्रमाणे काल दिनांक २१/११/२०२२ पासुन विशेष मोहीम सुरु करण्यात आली असुन सदर मोहीमे दरम्याण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या शाळा, कॉलेज, गर्दीची मुख्य ठिकाणे, सार्वजनिक ठिकाणे, मैदान, निर्जन स्थळे, बंद आस्थापणा अशा ठिकाणी तसेच शहरातुन जाणारे महामार्ग ईत्यादी ठिकाणी नशापाणी करणे, बेशीस्त वर्तन करणे, चिडीमारी करणे, असे प्रकार करणाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदयानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येत असुन सदरचे मोहीमेदरम्याण पो.स्टे. अवधुतवाडी येथे १२, यवतमाळ शहर येथे ०४, उमरखेड येथे १८, यवतमाळ ग्रामीण येथे ०१, नेर येथे ०१, व पुसद शहर येथे १० केसेस नोंद करण्यात आल्या आहेत. जिल्हयातील गुन्हेगारीला आळा घालण्याकरीता व शांतता व सुव्यवस्था अबाधीत राखण्याकरीता सदरचे कार्यवाहीचे सत्र यापुढेही सुरु राहणार असुन विशेषत: सायंकाळचे वेळी रिकामटेकडे व टवाळखोर तरुण तरुणींकडुन अशा स्वरुपाचे प्रकार जास्त प्रमाणात होत असल्याचे निदर्शनात आल्यामुळे असे प्रकार होत असलेल्या सर्व ठिकांणांवर पोलीस पथके नेमण्यात आली असुन असे प्रकार करतांना आढळणारे तरुण तरुणी यांचेविरुध्द कारयदेशीर कारवाई करण्यात येत असुन अशा तरुण तरुणींचे पालकांना सुध्दा त्यांचे पाल्याच्या वर्तनाची माहिती देवुन समज देण्यात येणार आहे.

**( प्रदीप परदेशी )**
**पोलीस निरीक्षक**
**स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ**